**इ.क्र. ४६, मोदी स्ट्रीट / १३९, मिंट रोड / १३७, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई अ विभाग (उपकर क्रमांक अ-१९४८(१-२) व २००१(१-२)), नाहरकत प्रमाणपत्र (परताव्यासह)**

E-3463412

जा.क्र.परिमंडळ-१/नाहप्र/ 2724 /२०२४.
उप-मुख्य अभियंता (परिमंडळ-१) यांचे कार्यालय,
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
ए-६६, दादरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.
दिनांक :- 11/12/2024

**प्रति,**

**वास्तुशास्त्रज्ञ**
**मेसर्स एस. बी. असोसिएट्स,**
**११७, काझी स्ट्रीट, फैझान मेन्शन,**
**पहिला मजला, पायधोनी,**
**मुंबई ४०० ०२८.**

Mumbai Building Repair &
Reconstruction Board,
Executive Engineer 'A' Ward,
Inward No. :- 3179
Date :- 12/12/2024

**(कार्यकारी अभियंता अ विभाग मार्फत)**

**विषय :- इ. क्र. ४६, मोदी स्ट्रीट / १३९, मिंट रोड / १३७, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई अ विभाग ( उपकर क्रमांक अ-१९४८(१-२) व २००१(१-२)), ना हरकत प्रमाणपत्र दुरूस्ती काम (परताव्यासह).**

**संदर्भ :- कार्यकारी अभियंता अ विभाग यांनी सादर केलेला प्रस्ताव दि.२८.११.२०२४ या कार्यालयास प्राप्त दि. ०३.१२.२०२४ च्या अनुषंगाने.**

**महोदय,**

भाडेकरु/रहिवाश्यांच्या विनंतीनुसार विषयांकित इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती नाहरकत पत्राद्वारे (परताव्यासह) करु देण्याच्या आपल्या प्रस्तावास या कार्यालयाच्या पत्र क्र. 2723 दि. 11/12/24 अन्वये अलाहिदा मान्यता देण्यात आली आहे व त्याची प्रत आपणांस पृष्ठांकित केलेली आहे हे आपणांस विदित आहेच. या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम आपल्या अधिपत्याखाली सुरु व्हावयाचे असल्याने त्याकामी वास्तुशास्त्रज्ञ म्हणून प्रामुख्याने आपली खालील कर्तव्ये व जबाबदा-या रहातील याची आपण कृपया नोंद घ्यावयाची आहे.

१. इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे नकाशे व अंदाजपत्रक मंडळाची प्रशासकिय मान्यता घेण्यासाठी दोन प्रतीत त्वरीत कार्यकारी अभियंता अ विभाग यांना सादर करावे.

२. लगोलग दुरुस्तीच्या कामासाठी मुंबई महानगरपालिकेकडून आयओडी (I.O.D.) व सीसी (C.C.) मिळण्यासाठी कार्यवाही सुरु करावी.

३. इमारतीची मोजमापे घेऊन मागील टप्प्याचे दुरुस्तीमध्ये विचारात घेतलेले बांधकाम क्षेत्रफळ व आताचे क्षेत्रफळात तफावत येत असल्यास त्याची कारणे कार्यकारी अभियंता यांना कळवावीत व त्याचे समर्थन द्यावे. योग्य समर्थन नसल्यास असे वाढीव क्षेत्रफळ हे अनधिकृत बांधकाम आहे असे समजण्यात येईल व त्यासाठी निधी मंजूर केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४. इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम फक्त ना-हरकत प्रमाणपत्र धारकाच्या भागातच केंद्रीत न होता काम पुर्ण झाल्यावर संपुर्ण इमारत संरचनात्मक दृष्टया सुरक्षित होईल याची दक्षता घ्यावी व हे अंतिम उद्दिष्ट आहे हे लक्षात घेऊन त्यानुसार नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

(PTO)

इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती आपल्या अधिपत्याखाली सुरु असताना इमारत, तिचा कोणताही भाग किंवा अनुलग्न जागेत कोणतेही अनधिकृत बांधकाम होणार नाही याची दक्षता व खबरदारी आपण घ्यावयाची आहे. अन्यतः त्यासाठी आपण व्यक्तीगत जबाबदार रहाल व मंडळाच्या पॅनेलवरुन आपले नांव काढून टाकण्यात येईल.तसेच वास्तुशास्त्रज्ञ म्हणून ना-हरकतपत्र धारक व / किंवा त्यांनी नेमलेल्या कंत्राटदारास दुरुस्तीचे कामांत सुरुवातीपासून शेवटपर्यंत संपुर्ण तांत्रिक मार्गदर्शन आपण द्यावयाचे आहे व ही आपली जबाबदारी राहील.महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशानुसार काम करुन घेणे आपणावर बंधनकारक राहिल. इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम सुरु केल्याची तारीख तसेच काम पुर्ण झाल्याची तारीख संबंधित महानगरपालिका कार्यालय, व मंडळाचे कार्यकारी अभियंता यांना कळवावी.

५. प्रत्यक्ष काम सुरु केल्यावर इमारतीचा सामाईक भाग, शौचालये, हाऊस गल्ली व धोकादायक भाग यांची संरचनात्मक दुरुस्ती प्रथम करुन घेणे आवश्यक आहे. काम सुरु असताना दर आठवडयात किमान २ वेळा किंवा आवश्यकता असल्यास गरजेनुसार अधिक वेळा कामाची तपासणी व कंत्राटदारास मार्गदर्शन/ सुचना देणे आवश्यक आहे व अशा सुचनांची १ प्रत संबंधित कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयास पाठवावी कामाचा दर्जा उत्तम राखण्याची आपली जबाबदारी राहिल.

आपला स्नेहांकित,

O. No./E.E/ A-DIV/RR 002 of 2025
Office of the Executive Engineer 'A' Ward,
25 Transists Camp, Cuffe Parade,
Colaba, Mumbai - 400 005.
Date : 02/01/2025

उपमुख्य अभियंता ( परिमंडळ-१ ),
मुं. इ. दु. व पु.मंडळ,मुंबई-३४.

१. **प्रत कार्यकारी अभियंता अ विभाग, मुं.इ.द, व पु.मंडळ** यांस माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी (सर्व प्रतींसह). कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावासोबत सादर केलेलया नकाशामध्ये भाडेकरु / रहिवाश्यांच्या यादीनुसार खोली क्र. / दुकान क्र. नमुद करावा. तसेच सदरहु इमारतीच्या दुरुस्तीसाठी यापूर्वी मंडळातर्फे नियुक्त झालेल्या वास्तुशास्त्रज्ञ / कंत्राटदारांचे काही दावे (claims) बाकी असल्यास त्याची पुर्तता करण्यात यावी.

२. **प्रत कार्यकारी अभियंता,(शहर-२** ) इमारत प्रस्ताव (दुरूस्ती व पुनर्बांधणी) महानगरपालिका, १/२ दोस्ती विनस, वाल्मीकी चौक, वडाला (पू ), मुंबई-३७.यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

उपमुख्य अभियंता / परि-१, दुवपु क्र. २७२४ दिनांक ११.१२.२०२४ [ प्रत जोडण्यांत येत आहे ] मधील अटी व शर्तींच्या अधिन राहून "ना हरकत प्रमाणपत्र" [ परताव्यासह ] रवाना.

सदर अटी व शर्तीची पूर्तता आठ दिवसात करण्यांत यावी, अन्यथा सदर ना हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्दबातल होईल याची कृपया नोंद घ्यावी. या कार्यालयाचे पत्र क्र. २७१६, दि. २७.१२.२०२४ चे अवलोकन व्हावे.

कार्यकारी अभियंता 27/12/24
अ विभाग, मुं.इ.दु. व पु. मंडळ, मुंबई.